महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ४८ वा | दिनांक : १३/११/२०२४ | वार : बुधवार

## देवाभाऊ - दाढीभाऊ - जॅकेटभाऊ, तिघे मिळून 'महाराष्ट्र खाऊ' : उद्धव ठाकरे



**औसा** : देवाभाऊ-दाढीभाऊ-जाकेटभाऊ हे तिघे मिळून 'महाराष्ट्र खाऊ' करत असल्याचा ओरोप उद्धव ठाकरे यांनी केला आहे. त्याचसाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले. महायुतीला मत म्हणजे गुजरातला मत असल्याचे म्हणत त्यांनी नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्यावरही निशाणा साधला. महाराष्ट्रातून निघताना मोदी आणि शहा यांच्या देखील बॅगा तपासा, कारण ते महाराष्ट्र लुटून जात असल्याचे ठाकरे यांनी म्हटले आहे. या माध्यमातून ठाकरे यांनी सत्ताधारी पक्षावर जोरदार टीका केली.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर धाराशिव जिल्ह्यातील औसा येथे उद्धव ठाकरे यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी त्यांनी भारतीय जनता पक्षासह मोदी - शहा यांच्यावर टीका केली. अमित शहा गृहमंत्रिपदाच्या खुर्चीवर बसण्यास योग्य नसल्याचे ठाकरे यांनी म्हटले आहे. मोदींच्या थापांमुळे महाराष्ट्र त्रस्त आहे. त्याच प्रमाणे माझी बॅग तपासण्यात अर्थ नाही, पण मोदी आणि शहा यांच्या बॅगा या तपासल्या पाहिजेत. महाराष्ट्रातून निघताना मोदी आणि शहा यांच्या बॅगा तपासा, कारण ते महाराष्ट्र लुटून निघाले असल्याचे ठाकरे यांनी म्हटले आहे. आज मला सोलापूरला जायचे होते, मात्र, हेलिकॉप्टरने येण्यापासून रोखले असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे महायुतीला मत म्हणजे गुजरातला मत असल्याचा दावा त्यांनी केला. सोलापूरच्या सभेत मोदींनी महाराष्ट्राच्या हितासाठी बोलावे, असे आवाहन देखील त्यांनी केले. मोदी पंतप्रधानपदासाठी योग्य नाहीत, त्यांनी १५ लाख देण्याचे सांगितले मात्र १५०० रुपयेच देत असल्याचे ठाकरे यांनी म्हटले आहे.

मंत्रालयात एक महत्वाची बैठक झाल्याची माहिती माझ्याकडे आली आहे. या बैठकीनंतर राज्यातील सोयाबून आणि कापूस उत्पादक शेतकरी कसा सुखी झाला आहे, याची जाहिरात काही वर्तमानपत्रात येऊ शकते. मात्र, राज्यातील सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकरी हा राज्यातील आणि केंद्रातील सरकारवर चिडलेला आहे. मोठ्या प्रमाणात खरेदी झाली असल्याचा दावा ते करत असले तरी देखील शेतकऱ्यांकडे अजूनही त्यांचा माल पडून असल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. काही दिवसात पेपर मध्ये तशा बातम्या देखील छापून येतील. मात्र या बातम्या छापून आल्यानंतर शेतकरीच बोलतील, अशा शब्दात त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली.

## राहुल गांधी यांची चिखली येथील सभा रद्द



**मुंबई** : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची चिखली येथील सभा रद्द करण्यात आली आहे. त्या नंतर त्यांनी महाराष्ट्रातील जनतेला एक व्हिडिओ संदेश दिला आहे. यामध्ये त्यांनी म्हटले की, 'मी तुम्हा सर्वांची माफी मागतो. मला आज चिखलीला यायचे होते.

तेथे मला सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना भेटायचे होते आणि एका जाहीर सभेला संबोधित करायचे होते. पण विमानातील तांत्रिक बिघाडामुळे मी येऊ शकलो नाही. मला माहित आहे की, महाराष्ट्रातील शेतकरी खूप अडचणींचा सामना करत आहेत. भाजप सरकार सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना रास्त भाव देत नाही. पण मी तुम्हाला आश्वासित करतो की, आमचे सरकार आल्यानंतर सरकार तुमची काळजी घेईल आणि तुमच्या समस्या त्वरित सोडवण्याचा प्रयत्न करेल.'

राहुल गांधी यांनी एक व्हिडीओ जारी करून ही माहिती दिली आणि सांगितले की, मला महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची परिस्थिती समजते आणि त्यांच्या समस्या जाणून घ्यायच्या होत्या. पण विमानातील तांत्रिक बिघाडामुळे ते शेतकऱ्यांना भेटू शकत नाहीत आणि त्यासाठी त्यांनी शेतकऱ्यांची माफी मागितली.

यापूर्वी राहुल गांधी त्यांची बहीण प्रियांका गांधी यांच्यासाठी वायनाडला गेले होते. प्रियंका गांधी या वायनाडमधून काँग्रेसच्या उमेदवार आहेत. राहुल गांधी यांनी रायबरेली मतदारसंघातून लोकसभा निवडणूकही जिंकली होती. यानंतर वायनाडची जागा रिक्त झाली. येथील सभेत राहुल गांधी यांनी पांढऱ्या रंगाचा टी शर्ट घातला होता.

ज्याच्या पाठीवर "आय लव्ह वायनाड" असे लिहिलेले होते. तर प्रियांका गांधी यांनी निळ्या रंगाची साडी परिधान केली होती. या वेळी राहुल गांधी म्हणाले की, "मी प्रियंका गांधींना वायनाडला जगातील सर्वोत्तम पर्यटन स्थळ बनवण्याचे आव्हान देऊ इच्छितो. हे साध्य करण्यासाठी मी मदत करेलच आणि त्याचा फायदा वायनाडच्या लोकांच्या आर्थिक विकासाला होईल."

## एकनाथ शिंदे यांच्या प्रचार ताफ्यात "गद्दार गद्दार" च्या घोषणा

**मुंबई** : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात प्रचार सभा जोरदार सुरू आहेत. यातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा ताफा अडवल्याची घटना समोर आली आहे. तसेच "गद्दार गद्दार", अशा घोषणा देण्यात आल्या. या घोषणा ऐकताच मुख्यमंत्री शिंदे गाडीच्या खाली उतरत थेट घोषणा देणाऱ्यांना जाब विचारल्याचे समोर आले आहे.

चांदिवली विधानसभा मतदारसंघात काँग्रेसकडून नसीम खान हे उमेदवार आहेत. त्यांच्या कार्यालयासमोरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा ताफा जात होता. तेव्हा काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्र्यांचा ताफा अडवला. तसेच गद्दार असे म्हणत घोषणा देण्यात आल्या. याच वेळी संतोष कटके या तरुणाने मुख्यमंत्री शिंदे यांना उद्देशून अपशब्द वापरले. हे ऐकताच मुख्यमंत्र्यांचा पारा चढला असल्याचे पाहायला मिळाले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी चिडले आणि थेट गाडीतून उतरले आणि समोर असलेल्या नसीम खान यांच्या कार्यालयात चालत गेले. तेथील काँग्रेस आणि ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांना "ऐसा सिखाते क्या आप लोग?", अशा कडक शब्दात शिंदेंनी खडसावले. यानंतर पोलिसांनी संतोष कटके आणि इतर कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले व नंतर सोडून देण्यात आले.

संतोष कटके याचे वडील साधू कटके हे आरपीआय (आठवले गट) पक्षाचे जिल्हाध्यक्ष आहेत. संतोष कटकेने मुख्यमंत्र्यांचा ताफा अडवल्याने ते चर्चेत आले आहेत. संतोष कटके यांनी सकाळीच ठाकरे गटात प्रवेश केला आहे. मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांची भेट देखील त्याने घेतली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी विचारले की काल शाखेत कोण होते? तेव्हा कार्यकर्त्यांनी संतोष कटके याला पुढे केले आणि सांगितले की हाच होता ज्याने गद्दार म्हणले. यावर उद्धव ठाकरे यांनी शाब्बास!! हा फोटो मुद्दाम द्या, त्यांच्यापर्यंत जाऊ द्या, अशी प्रतिक्रिया दिली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १३ नोव्हेंबर २०२४


## स्मशानभूमी मागणी साठी रामनगर ग्रामस्थांचा मतदान वरती बहिष्कार




**कन्नड (अरुण थोरात) :** तालुक्यातील रामनगर येथील स्मशानभूमी च्या मागणी साठी आगामी सर्व निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा इशारा दिला आहे. अंजना पळशी प्रकल्पासाठी वाडी पळशी हे गाव भूसंपादित करण्यात आले होते . त्यानंतर या गावाचे नाव रामनगर करण्यात आले. रामनगर गावाचे पुनर्वसन नगर रचने नियमा प्रमाणे करण्यात आले. शासनाने रामनगर गावात २५ हेक्टर ६६ आर भूखंड या पुनर्वसित गावासाठी चा नकाशा तयार केला होता. लघु पाटबंधारे का. अभियंता यांनी १९९४ ला लेआउट केले. १९९८ मध्ये रामनगर गाव पुनर्वसित करण्यात आले.

हे गाव पुनर्वसित होऊन तब्बल २६ वर्ष उलटले परंतु नगर रचनेच्या नकाशामध्ये या गावासाठी शासनाने दफनभूमी, स्मशानभूमी प्लॉट लाईन फुल रस्ते रोड यासारख्या बऱ्याच बाबी शासनाने सर्व कागदावर दाखवले आहे.असे ग्रामस्थांचे म्हणने आहे. गाव पुनर्वसीत होऊन तब्बल २६ वर्ष उलटली तरी ही गावाला अनेक बाबीं पासून वंचित राहावे लागत आहे. गावात अंत्यविधीसाठी स्मशानभूमी व दफनभूमी वर काही शेतकऱ्यांनी अतिक्रमण केलेले असल्याचा आरोप आहे. वारंवार मागण्या करुण ही त्या पूर्ण होत नसल्याने ग्राम येणाऱ्या निवडणुकीवर बहिष्कार टाकणार असल्याचा निर्णय घेतल्याचे जिल्हाधिकारी यांना दिलेल्या या निवेदनात म्हटले आहे.

सरकार दरबारी वारंवार चकरा मारून ही तक्रारी ची दखल घेत नसल्याचा आरोप ही ग्रामस्थ करीत आहे.या गावात २०२२ मध्ये एका भिल्ल समाजाच्या महिलेचा. मृत्यू झाला होता. दफनभूमी नसल्याने भिल्ल समाजाने मारुती मंदिरासमोर त्या महिलेचा दफन विधी केला होता. त्यामुळे पुनर्वसित रामनगर गावात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. तत्कालीन तहसीलदार संजय वरकड व सहाय्यक पोलीस निरीक्षक कोमल शिंदे यांनी या गावातील नागरिकांची समजूत काढून गावात तणावपूर्ण शांतता ठेवली होती.

तहसीलदारांनी नागरिकांना शांतता ठेवण्याचे आवाहन करून लवकरात लवकर तुमच्या गावाच्या समस्या दूर केल्या जाईल असे आश्वासन दिले होते. अशाच प्रकारे ऑगस्ट २०२४ मध्येही गावातील एका नागरिकाचे निधन झाले होते. तेव्हा ही अंत्यविधीसाठी जागा उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे नागरिकांना मारुती मंदिराच्या पाठीमागे अंत्यविधी करावा लागला होता. त्यावेळी पिशोर ठाण्याचे सपोनि. शिवाजी नागवे यांना बंदोबस्त द्यावा लागला होता. तरी ही अंत्यविधीला जागा उपलब्ध होत नसल्याने मंदिराच्या पाठीमागे अंत्यविधी करावा लागला.

अशाप्रकारे वारंवार निवेदन देऊन ही या प्रश्न मार्गी लागू शकला नाही.परिणामी रामनगर येथील नागरिकांनी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीवर गावातील सर्व नागरिक बहिष्कार टाकत असल्याचे निवेदन जिल्हाधिकारी यांना दि. ५ नोव्हेंबर रोजी दिलेले आहे. जोपर्यंत गावातील स्मशानभूमी दफनभूमी साठी भूखंड मिळणार नाही. तोपर्यंत येणाऱ्या सर्व निवडणुकां वर बहिष्कार असेल असे निवेदन देण्यात म्हटले आहे.

## टाकळी अंतूर येथील विधवा महिलेच्या मका गंजी ला आग



**कन्नड (अरुण थोरात) :** टाकळी अंतूर ता. कन्नड येथील एका विधवा महिलेच्या शेतातील मका कणसांच्या गंजी ला अज्ञाताने आग लावल्याने हजारो रुपयांचे नुकसान झाले आहे.टाकळी अंतूर येथील यशोदाबाई मुरलीधर सपकाळ या विधवा महिलेने आपल्या गट क्र. २५७ मधिल शेतात मका पिकाची तोडणी करुण कणसे, दाणे वाळण्यासाठी गंजी मारुण ठेवले होते. परंतू दि. ११ नोव्हेंबर रोजी कोणीतरी अज्ञात माथेफिरू ने या गंजीस आग लावली. त्यामुळे सदरील शेतकरी महिलेचे हजारो रुपयांचे नुकसान झाले आहे. सदरील घटनेचा तलाठी श्री भिसे यांनी पंचनामा केला आहे.आधीच अतिवृष्टी मुळे शेतकर्यांचे मोठे नुकसान झाले असतांनाच अशा विकृत मानसिकते मुळी या महिलेवर आर्थिक संकट कोसळले आहे. तरी शासनाने याची गंभीर दखल घेऊण पीडीत महिलेला तात्काळ भरीव मदत देण्याची मागणी मा.पंचायत समिती सदस्य प्रा. समाधान गायकवाड यांनी केली आहे.

## मनोज भाऊ पवार यांची औराळा येथे विराट सभा



**कन्नड (अक्षय चव्हाण) :** कन्नड-सोयगाव विधानसभा मतदार संघाचे अपक्ष उमेदवार मनोज भाऊ पवार यांनी प्रचारार्थ मतदार संघातील औराळा येथे भव्य सभा पार पडली यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांना भाषणात भाऊंनी सांगितले की आपल्या तालुक्यात असलेला बेरोजगार पणा, थांबलेला विकास, एम. आय. डी. सी, रेल्वे, तरुणांना रोजगार, महिलांना घर उद्योग, एमआयडीसी साठी पैठण वरून पाणी अनांवे लागेल असे अनेक तालुक्याचे प्रश्न आहे ते सोडविण्यासाठी मी निवडणूक लढवत आहे.

आपल्या तालुक्याला एका सक्षम नेतृत्वाची गरज आहे त्यासाठी मी उभा आहे असे सांगून उपस्थित असलेले सर्व मतदार वर्ग मित्र परिवार वडीलधारे व्यक्ती सर्व गट प्रमुख बूथ प्रमुख सर्वांचे आभार मानले.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १३ नोव्हेंबर २०२४

# सौदीचे राजकुमार सलमान म्हणाले- इस्त्रायल गाझात नरसंहार करत आहे



**रियाध :** सौदीचे क्राउन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान म्हणाले की, इस्त्रायल गाझा आणि लेबनॉनमध्ये 'नरसंहार' करत आहे. बीबीसीच्या रिपोर्टनुसार, प्रिन्स सलमान सोमवारी रियाधमध्ये एका शिखर परिषदेला संबोधित करत होते. प्रिन्स सलमान म्हणाले की, पॅलेस्टाईन हा स्वतंत्र देश असून त्याला वेगळ्या देशाचा दर्जा मिळायला हवा. इराणशी संबंध सुधारण्याचे संकेतही त्यांनी दिले. सलमान यांनी इस्त्रायलला इराणवर हल्ला न करण्याचा इशारा दिला आणि वेस्ट बँक आणि गाझामधून इस्त्रायली सैन्य मागे घेण्याची मागणीही केली.

गाझा युद्ध सुरू झाल्यानंतर सौदी अरेबियाने इस्त्रायलवर एवढी जोरदार टीका करण्याची ही पहिलीच वेळ आहे.

सौदी अरेबियाच्या पुढाकाराने, मध्यपूर्वेतील इस्त्रायली कारवायांवर चर्चा करण्यासाठी रियाधमध्ये मुस्लिम आणि अरब नेत्यांनी आपत्कालीन बैठक बोलावली होती. जगातील ५० हून अधिक मुस्लिम देशांचे प्रतिनिधी यात सहभागी झाले होते.

अमेरिकेतील अध्यक्षपदाच्या निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांनी विजय मिळवला आहे अशा वेळी ही शिखर परिषद बोलावण्यात आली आहे. असे मानले जाते की इस्लामिक देश ट्रम्प यांच्यावर नैतिक दबाव आणू इच्छित आहेत जेणेकरून त्यांनी इस्त्रायलची कृती थांबवावी.

अल जझीराच्या वृत्तानुसार, शिखर परिषदेपूर्वी राष्ट्राध्यक्ष मसूद पझाकियान यांनी सौदीच्या क्राउन प्रिन्सला फोन केला होता. या शिखर परिषदेचे आयोजन केल्याबद्दल त्यांनी सौदी अरेबियाचे कौतुक केले. त्यांनी सलमान यांना सांगितले की ते या शिखर परिषदेला वैयक्तिकरित्या उपस्थित राहू शकणार नाही पण ते आपले प्रतिनिधी म्हणून इराणच्या पहिल्या उपराष्ट्रपतींना पाठवत आहे.

बैठकीत इराणचे उपराष्ट्रपती मोहम्मद रेझ आरेफ यांनी गाझामध्ये घडत असलेल्या घटनांचे वर्णन 'लज्जास्पद आपत्ती' असे केले आणि सर्व मुस्लिम देशांनी इस्त्रायलला प्रत्युत्तर देण्यासाठी एकत्रितपणे कारवाई करण्याचे आवाहन केले.

गेल्या वर्षी ११ नोव्हेंबर रोजी रियाध येथे शिखर परिषद आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत अनेक मुस्लिम देशांचे नेतेही सहभागी झाले होते. तेव्हाही मुस्लिम देशांनी एकत्र येऊन इस्त्रायलवर निर्बंध लादण्याची मागणी केली होती.

गाझा आरोग्य मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, इस्त्रायलने ७ ऑक्टोबरपासून एकट्या गाझामध्ये ४३ हजारांहून अधिक लोकांची हत्या केली आहे. त्याचबरोबर इस्त्रायलने हमासच्या १८ हजारांहून अधिक सैनिकांना ठार केल्याचा दावा केला आहे.

# उद्धव ठाकरेंना आताच मुख्यमंत्री चेहरा घोषित करा

**मुंबई :** रियाणा विधानसभा निवडणुकीतील निकालाची पुनरावृत्ती टाळायची असेल तर महाविकास आघाडीने आत्ताच उद्धव ठाकरे यांच्या नावाची मुख्यमंत्रीपदाचा चेहरा म्हणून घोषणा करावी, अशी मागणी आम आदमी पक्षाचे बडे नेते संजय सिंह यांनी केली आहे. संजय सिंह यांनी ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ही मागणी केली आहे. त्यावर मविआतील इतर पक्ष काय प्रतिक्रिया देतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचा ज्वर वाढला आहे. महाविकास आघाडीतील सर्वच पक्ष आपसातील मतभेद विसरून सत्ताधारी महायुतीच्या विरोधात रान पेटवत आहेत. या पार्श्वभूमीवर संजय सिंह यांनी मंगळवारी महाविकास आघाडीच्या मुख्यमंत्रीपदाच्या चेहऱ्याच्या मुद्याला हात घातला आहे.

संजय सिंह म्हणाले, महाविकास आघाडीने आत्ताच आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या चेहऱ्याचे नाव घोषित करावे. त्यांनी या प्रकरणी विलंब केला तर त्यांचेच नुकसान होईल. हरियाणात तेच झाले होते. तिथे काँग्रेसमधील गटांनी एकमेकांना पाडण्याचा प्रयत्न केला त्यात काँग्रेसचे जबर नुकसान झाले. त्यामुळे मविआने कुणाचे आमदार जास्त येतील, या भानगडीत पडू नये. उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये जबरदस्त काम केले आहे. मराठी माणूस व मराठी स्वाभिमान या दोन्ही गोष्टी त्यांच्यासोबत जोडल्या जातात. त्यामुळे त्यांच्या नावाची मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार म्हणून घोषणा केली तर महाविकास आघाडीचा मोठा फायदा होईल असे मला वाटते.

भाजपचा पराभव हेच आम आदमी पार्टीचे एकमेव उद्दीष्ट आहे. त्यामुळेच आम्ही महाविकास आघाडीत जागा मिळूनही त्या घेतल्या नाही, असेही संजय सिंह यांनी यावेळी ठणकावून सांगितले.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचा महायुतीसोबत वाद सुरू आहे. कारण, त्यांनी त्यांच्या मुलाला हवी ती जागा सोडली नाही. त्यामुळे राज ठाकरे भाजपचे समर्थन करत असतील असे मला वाटत नाही. ते वेगवेगळी भूमिका घेत आहेत. मनसेमुळे मविआची काही मते कमी होतील, पण उद्धव ठाकरे यांच्या नावाची महाविकास आघाडीचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार म्हणून घोषणा केली तर मतांची हे विभाजन टाळता येईल, असे संजय सिंह म्हणाले.

भाजपने महाराष्ट्रासोबत सावत्र आईसारखा व्यवहार केल्याची टीकाही संजय सिंह यांनी यावेळी केली. ते म्हणाले, महाराष्ट्रात झालेले फोडाफोडीचे राजकारण सर्वांनी पाहिले. भाजपने महाराष्ट्रासोबत सावत्र आईसारखा व्यवहार केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रातील अनेक योजना व प्रकल्प गुजरातला नेल्या. एका राज्याच्या विकासासाठी दुसऱ्या राज्याचे नुकसान करणे योग्य नाही. आतापर्यंत आपण दुचाकीचोर व इतर चोर पाहिले. पण भाजपने अख्खे पक्षच चोरले.

एवढेच नाही तर त्यांनी अंडरवर्ल्ड डॉन इक्बाल मिर्चीसोबत संबंध असलेल्यांना आपल्यासोबत घेतले. त्यांनी अजित पवारांवर भ्रष्टाचाराचे आरोप करून आपल्या गोटात वळवले हे ही सर्वश्रुत आहे.

संजय सिंह यांनी यावेळी भाजपच्या एक है तो सेफ हैच्या घोषणेचाही समाचार घेतला. पंतप्रधान १० वर्षांनंतर एक है तो सेफ हैचा नारा देत आहेत. एकाअर्थाने ते हिंदू समाजाला घाबरवत आहेत. त्यांना अशी भाषा शोभा देते का? तुम्ही हिंदूंना सुरक्षित ठेवत नसाल तर तुम्ही आपल्या पदाचा राजीनामा द्या. बटेंगे तो कटेंगे हा काय नारा आहे का? एकजूट राहिलो नाही तर संविधान संकटात येईल, आरक्षण संपुष्टात येईल. त्यामुळे एकजूट राहा आणि भाजपचे काम तमाम करा, असे ते म्हणाले.

# काहीही बोलणे हे राज ठाकरे वैशिष्ट्य, त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे हीच आमची भूमिका : शरद पवार



**मुंबई :** काहीही बोलणे हे राज ठाकरे यांचे वैशिष्ट्य आहे. त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे हीच आमची भूमिका असल्याचे शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी म्हटले आहे. गेल्या काही दिवसांपासून राज ठाकरे विरुद्ध शरद पवार असे आरोप-प्रत्यारोप होताना दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी आता काहीही बोलणार नसल्याचे म्हणत राज ठाकरे यांच्याकडे दुर्लक्ष करण्याची भूमिका मांडली आहे.

शरद पवार हे जातीवादी असून त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात कायम जातीवाद केला असल्याचा आरोप राज ठाकरे यांनी केला होता. त्याला उत्तर देताना शरद पवार यांनी मी जातिवाद केल्याचे एकही तरी उदाहरण दाखवून द्या, असे आव्हानच राज ठाकरे यांना दिले होते. शरद पवार यांच्या आव्हानाल प्रत्युत्तर देत राज ठाकरे यांनी देखील एका वृत्तवाहिनीच्या मुलाखतीमध्ये थेट उदाहरण मांडले होते. शरद पवार यांनी पुणे येथील एका कार्यक्रमात छगन भुजबळ यांच्या डोक्यावरील पुणेरी पगडी काढून ही पगडी नको तर फुलेंची पगडी घाला, असे म्हणत जातीवाद केला होता. असे उदाहरण राज ठाकरे यांनी दिले होते. त्याला आता शरद पवार यांनी देखील उत्तर दिले आहे.

याबरोबरच शरद पवार यांनी राज ठाकरे यांनी आतापर्यंत काहीही केले नसल्याचे म्हटले होते. त्याला देखील राज ठाकरे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. शरद पवार यांना मी काय केले, याची एक पुस्तिकाच आता पाठवून देतो. वयाच्या मानाने त्यांना आता काही आठवत नसेल, असे म्हणत राज ठाकरे यांनी शरद पवार यांच्यावर पलटवार केला होता. त्यामुळे आता या दोन नेत्यांमधील आरोप - प्रत्यारोप सुरू झाले असल्याचे दिसून आले होते.

राज ठाकरे यांच्या प्रत्युत्तरावर आता शरद पवार यांनी अधिक बोलणे टाळले आहे. राज यांनी दिलेल्या उदाहरणावर शरद पवार यांनी प्रतिक्रिया दिली नाही. या संदर्भात प्रसार माध्यमांनी शरद पवार यांना प्रतिक्रिया विचारली असता शरद पवार यांनी बोलणे टाळल्याचे दिसून आले. राज ठाकरे हे कायम काहीही बोलत असतात. त्यामुळे त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्याची आता आमची भूमिका असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १३ नोव्हेंबर २०२४


## महाविकास आघाडीची भ्रष्टाचार करण्यात पीएच.डी. : पंतप्रधान मोदी

**चंद्रपूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात पुन्हा एकदा भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेच्या नेतृत्वातील महायुतीचे सरकार येणार असल्याचा ठाम विश्वास व्यक्त केला.

चिमुरच्या सभेला उपस्थित असणाऱ्या मतदारांच्या संख्येवरून या निवडणुकीचा निकाल स्पष्ट झाला आहे. राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे बहुमताचे सरकार अस्तित्वात येईल. त्यानंतर केंद्र व राज्यातील डबल इंजिन सरकारमुळे महाराष्ट्राचा विकासही दुप्पट वेगाने होईल, असे ते म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मंगळवारी चंद्रपूरच्या चिमुर विधानसभा मतदारसंघात सभा झाली. या सभेत त्यांनी महायुतीच्या संकल्पपत्राचे कौतुक करत हे संकल्पपत्र महाराष्ट्राच्या पुढील ५ वर्षांच्या विकासाची गॅरंटी असल्याचे स्पष्ट केले.

नरेंद्र मोदी म्हणाले, महायुतीच्या संकल्पपत्रात लाडकी बहीण, शेतकरी, तरुण व महाराष्ट्राच्या विकासासाठी एकाहून एक सरस संकल्प करण्यात आलेत. एआय यूनिव्हर्सिटी असेल, वॉटर ग्रिड प्रकल्प असेल, प्रत्येक घराला नळाद्वारे शुद्ध पाणी पुरवठा करणारी योजना असेल, पक्के घर असो किंवा डिजिटल कनेक्टिव्हिटी जाळे पसरवणे असो या सर्वांचा यात समावेश आहे. मी महाराष्ट्राच्या जनतेला या संकल्पपत्रासाठी शुभेच्छा देतो. हे संकल्पपत्र पुढील ५ वर्षांसाठी महाराष्ट्राच्या विकासाची गॅरंटी बनेल.

महायुतीसोबत केंद्रात एनडीएचे सरकार आहे. त्यामुळे महाराष्ट्रात डबल इंजिनचे सरकार येईल. म्हणजे विकासाचा वेगही दुप्पट वेगाने होईल. महाराष्ट्राच्या लोकांनी मागील अडीच वर्षांत विकासाचा हा दुप्पट वेग पाहिला आहे. आज महाराष्ट्र परकीय गुंतवणुकीत पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे. येथे विकासाच्या अनेक योजना होत आहेत. आज राज्यात जवळपास १ डझन वंदे भारत रेल्वे धावत आहेत. राज्यातील १०० हून रेल्वे स्थानकांचा कायापालट होत आहे. एवढेच नाही तर अनेक रेल्वेमार्गांचा विस्तारही होत आहे.

महायुतीचे सरकार किती वेगाने काम करते हे जनता पाहत आहे. पण ही महाविकास आघाडीची जमात या वेगाला कशी खिळ घालते हे चंद्रपूरच्या जनतेला चांगलेच ठावूक आहे. येथील जनता अनेक दशकांपासून रेल्वेची मागणी करत होते. पण काँग्रेस आघाडीने त्याकडे दुर्लक्ष केले. पण आमच्या सरकारने येथील विविध रेल्वे मार्गांना मंजुरी दिली. याचा येथील जनतेला मोठा फायदा होईल. त्यांचा वेळ व पैसे वाचतील, असे मोदी म्हणाले.

## आम्ही हार पत्करू, पण लाचारी नाही : देवेंद्र फडणवीस



**मुंबई :** त्यांनी मतांकरीता लाचारी पत्करली असेल, अरे आम्ही हार पतकरू, पण लाचारी पत्करणार नाही, आम्ही शिवबाची पोरं आहोत, शिवबाचे मावळे आहोत असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंवर जोरदार टीकास्त्र सोडले.

मतांची लाचारी स्वीकारून 'हिंदू हृदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे' यांना 'जनाब बाळासाहेब ठाकरे' म्हणत असेल, तर आम्ही ते खपवून घेणार नाही, असा इशाराही फडणवीस यांनी दिला. मुंबईतील ओशिवरा मतदारसंघात आयोजित महायुतीच्या प्रचार सभेत बोलताना फडणवीसांनी ही टीका केली आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, आम्ही कोणत्या जाती धर्माच्या किंवा इतर कुणाच्याही विरोधात नाही. पण आम्ही लांगूल चालन खपवून घेणार नाही. जस्टिस फॉर ऑल, अपीजमेंट ऑफ नन, असे आमचे म्हणणे आहे. कुणी मतांची लाचारी स्वीकारून 'हिंदू हृदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे' यांना 'जनाब बाळासाहेब ठाकरे' म्हणत असेल, तर आम्ही ते खपवून घेणार नाही, कारण मतांसाठी लाचारी पत्करणारे आम्ही नाही, एवढेच नाही तर, आम्ही हार पतकरू, पण लाचारी पत्करणार नाही, असे म्हणत फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

